# विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

## नगरपरिषद प्रशासन शाखा

Fax ०२४०-२३३१०८३ E-Mail- abdrdma@gmail.com

जा.क्र.२०१९/नपाप्र/ सिटी को-ऑ. नियुक्ती /कावी- दिनांक २९/०६/२०१९

प्रति ,
श्रीमती- अंजली बद्रीनाथ हिवाळे,
रा. पोस्ट वाहेगाव ता. गंगापूर जि. औरंगाबाद

**विषय :- स्वच्छ सर्वेक्षण २०२०**
**"सिटी को-ऑर्डिनेटर" या कंत्राटी पदावर नियुक्ती बाबत.**

स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत "स्वच्छ सर्वेक्षण २०२०" करिता कंत्राटी तत्वावर आपली निवड "सिटी को-ऑर्डिनेटर" म्हणून करण्यात येत आहे. सदर पद पूर्णत: कंत्राटी तत्वावर ठोक मासिक परिश्रमिकावरील असल्याने, नियमित शासकीय कर्मचाऱ्यांना असलेल्या कोणत्याही सेवा सुविधा आपणास अनुज्ञेय असणार नाहीत.

**आपली नियुक्ती औरंगाबाद विभागातील गंगापूर नगरपरिषद,औरंगाबाद जिल्हा करिता करण्यात आलेली आहे.** सदर कंत्राटी नियुक्ती संबंधित शहरातील स्वच्छ सर्वेक्षण २०२० ची कार्यवाही पूर्ण होईपर्यंत राहील. **आपली नियुक्ती दिनांक ३ जुलै,२०१९ पासून करण्यात येत आहे. दिनांक ३ जुलै रोजी आपण प्रथम औरंगाबाद विभागीय आयुक्त कार्यालय येथे रुजू अहवाल सादर करावा आणि विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद सभागृह येथे सकाळी ११.०० वाजता प्रशिक्षणासाठी उपस्थित रहावे . सदर प्रशिक्षण अनिवार्य आहे याची कृपया नोंद घ्यावी. दिनांक ४ जुलै रोजी आपण नियुक्त करण्यात आलेल्या नगरपरिषद येथे रुजू व्हावे .** आपणास खालील नमूद अटी व शर्ती मान्य असल्यास विहीत मुदतीत आपण रुजू व्हावे . आपण विहीत मुदतीत रुजू झाला नाहीत, तर आपणास या पदावर काम करण्यास स्वारस्य नाही, असे समजून आपली निवड रदद् समजण्यात येईल व पुढील उचित कार्यवाही करण्यात येइल, याची नोंद घ्यावी.

सदर नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत आपणास दरमहा पारिश्रमिक रु. ३ ०,०००/- (अक्षरी- तीस हजार रुपये मात्र) अदा केले जाईल.

**अटी व शर्ती :-**

१. आपली स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत "स्वच्छ सर्वेक्षण २०२०" करिता कंत्राटी तत्वावर "सिटी को-ऑर्डिनेटर या पदासाठी नियुक्ती आपणास नियुक्ती दिलेल्या दिनांकापासून ते आपल्या शहराची "स्वच्छ सर्वेक्षण २०२० " ची कार्यवाही पूर्ण होईपर्यंत राहील. शहराचे स्वच्छ सर्वेक्षण पूर्ण होताच नियुक्ती संपुष्टात येईल .

२. सदर नियुक्ती संपुष्टात येताना /आल्यावर आपणास कायम होणे बाबत कोणताही हक्क सांगता येणार नाही.

३. सर्वेक्षण २०२० हा कालमर्यादीत कार्यक्रम असल्याने आवश्यक कामे विहीत कालावधीत पूर्ण करण्याच्या दृष्टीने आपणास मुख्यालयाच्या ठिकाणी निवासी राहणे बंधनकारक आहे.

४. "सिटी को-ऑर्डिनेटर"या पदासाठी आपणास दरमहा रु. ३ 0000/- ठोक पारिश्रमिक दिले जाईल.

५. आपणास मुख्याधिकारी यांच्या संपूर्ण नियंत्रणाखाली काम करण्याचे आहे. आपणास सोपविण्यात आलेल्या कामाचा दरमहा आढावा संबंधित मुख्याधिकारी घेतील. त्यानुसार पुढील कालावधीसाठी सेवा सुरु ठेवाव्यात अथवा नाही याचा निर्णय प्रादेशिक उपसंचालक स्तरावर घेण्यात येईल .

६. स्थानिक नागरी स्वराज्य संस्थामध्ये "स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण घनकचरा व्यवस्थापन इत्यादी संबंधी उत्कृष्ट अंमलबजावणी चे कामकाज आपणास वरिष्ठांनी दिलेल्या सुचनेनुसार व केंद्र/ राज्य शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार करणे बंधनकारक राहील.

७. अभियानांतर्गत केलेल्या कामाचे दस्ताऐवजीकरण अद्यावत करणे तसेच कार्यालयीन कामकाजाकरिता आवश्यक त्या बैठकींना उपस्थित रहाणे बंधनकारक राहील. त्या अनुषंगाने होणारा प्रवास खर्च व दैनिक भत्ता आपणास राज्य शासनाच्या गट क दर्जाच्या कर्मचाऱ्यांच्या वेतनमानास अनुसरून प्रतिपूर्ती (Reimbursement) स्वरूपात अनुज्ञेय राहील. त्यासाठी विहीत पध्दतीने देयके संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेकडे सादर करणे आवश्यक राहील.

८. आपणास आपल्या पदस्थापनेच्या कालावधित कमाल ४ रजा अनुज्ञेय राहतील. अनुज्ञेय रजेपेक्षा जास्त कालावधीची रजा उपभोगल्यास/ गैरहजर राहिल्यास परिश्रमिक त्या अनुषंगाने कपात करण्यात येईल व त्या संदर्भात योग्य ती कारवाई ही केली जाईल.

९. आपल्या नियुक्तीचे पद पूर्णत: कंत्राटी तत्वावर ठोक परिश्रमिकावरील असल्याने, नियमित शासकीय सेवेत समायोजनासंबंधी कोणताही दावा आपणास दाखल करता येणार नाही.

१०. प्रवास करताना कोणत्याही प्रकारचा अपवात झाल्यास, अपघातासंबंधी कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई या कार्यालयामार्फत अनुज्ञेय राहणार नाही.

११. आपणास प्राप्त होणारी कागदपत्रे, माहिती व आधार सामुग्रीबाबत गोपनियता वाळगणे आवश्यक राहील.तसेच कार्यमुक्त होताना सदरची कागदपत्रे, माहिती व आधार सामुग्री सबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेकडे जमा करणे आवश्यक राहील .

१२. नियुक्तीच्या कालावधीत वरिष्ठांनी वेळोवेळी सूचवलेली/ निर्देशीत केलेली कामे/ कर्तव्ये विहीत वेळेत पार पाडावी लागतील.

१३. पदभार स्वीकारल्यानंतर आपल्या नियुक्तीच्या कालावधीत **स्वच्छ सर्वेक्षण २०२०** ची कार्यवाही पूर्ण होईपर्यंत आपणास कोणत्याही परिस्थितीत राजीनामा देता येणार नाही.

१४. आपल्याकडे शैक्षणिक पात्रता व अनुभव नसल्याचे आढळून आल्यास आपली नियुक्ती तात्काळ रदद् करण्यात येईल.

१५. आपल्यावर कोणत्याही प्रकारचा फ़ौजदारी गुन्हा दाखल असल्यास/ झाल्यास आपली नियुक्ती तात्काळ रदद् करण्यात येईल.

१६. आपल्या नियुक्तीच्या कालावधी मध्ये कोणत्याही प्रकारचे 'Conflict Of Interest 'निदर्शनास आल्यास आपली नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल

१७. नियुक्तीच्या कालावधीमध्ये आपण कोणत्याही प्रकारचे गैरवर्तन केल्यास आपली नियुक्ती कारण न देता तात्काळ रदद् करण्यात येईल.

१८. आपले काम समाधानकारक नसल्यास प्रादेशिक संचालक यांच्या अहवालानुसार किंवा विशेष परिस्थितीत आपली नियुक्ती रदद् करण्याचे अधिकार महाराष्ट्र नागरी विकास अभियान संचालनालयाकडे राहतील.

२९/६/१९

(शिवाजी शिंदे)
प्रादेशिक उपसंचालक
नगरपरिषद प्रशासन विभाग
विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद

प्रत :-

१) मा. कार्यकारी संचालक, स्वच्छ महाराष्ट्र नागरी विकास अभियान संचालनालय, मुंबई .
२) जिल्हा प्रशासन अधिकारी , नगरपरिषद शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद
३ ) मुख्याधिकारी ,नगरपरिषद गंगापूर ,जि. औरंगाबाद